# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील अनुसुचीत जातीतील गरीब शेतक-यांची सामाजिक व आर्थिक उन्नती व्हावी यासाठी विशेष घटक योजना राबविण्यात आल्याबाबत**

**(१) ६३०७ (१०-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसुचीत जातीतील गरीब शेतक-यांची सामाजिक व आर्थिक उन्नती व्हावी यासाठी राज्य शसनाच्या वतीने सन १९८२ पासून विशेष घटक योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत योजना असुनही पुरेसे पात्र लाभार्थी मिळत नाहीत अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेत लाभार्थ्याला एकदा लाभ मिळाल्यास पुन्हा आजन्म दुस-यांदा या योजनेचा लाभ घेता येत नसल्याने या योजनेसाठी शासनाने प्रत्येक जिल्ह्याला दिलेले उद्दिष्ट अपुर्ण राहात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेतील निकष योजना सरु झाल्या पासून गरजे नुसार एकदाही बदलण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या योजनेचे निकष बदलण्याबाबत शासन स्तरावरुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सन २०१० च्या कृषी जनगणनेनुसार राज्यात अनुसूचित जाती/नवबौध्द प्रवर्गातील १०.२९ लाख खातेदार असून, सन १९९२-९३ ते २०१३-१४ या कालावधीसाठी २.४५ लाख (२३.८०%) लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतला आहे. अद्याप ब-याच लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ मिळणे बाकी आहे.

तथापि, ठाणे, पुणे व गोंदिया या जिल्ह्यांमध्ये सन २०१४-१५ मध्ये पुरेसे पात्र लाभार्थी न मिळाल्यामुळे, सदर जिल्हयांचा अखर्चित निधी इतर जिल्ह्यांना मागणीनुसार वर्ग केला आहे.

(४) हे खरे नाही.

योजनेअंतर्गत असलेले उत्पन्नाची मर्यादा अनुदानांचे दर इ. निकषांमध्ये वेळोवेळी बदल करण्यात आले आहेत.

(५) सद्यःस्थितीत कृषी साहित्याच्या वाढलेल्या किंमती विचारात घेऊन अनुदानाच्या दरामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील जुन्या वीज वाहक तारा बदलण्याबाबत व अपघातग्रस्तांना वेळेवर मोबदला देणेबाबत

**(२) ६३२३ (०७-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील सविदंणे येथील लंघे मळ्यामध्ये महावितरणाची वीजेची तार तुटून शेतकऱ्यांच्या अंगावर पडल्या ची घटना दि. २३ डिसेंबर, २०१४ रोजी घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास पुणे जिल्ह्यातील महावितरणच्या वीज वाहक तारा अनेक दिवसापासुन बदललेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास जुन्या वीज वाहक तारांमुळे अनेक अपघात होऊनही अपघात ग्रस्तांना महावतिरणकडून मोबदला कमी दिला जात असून तो वेळेवर दिला जात नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे जिल्ह्यातील जुन्या वीज वाहक तारा बदलण्याबाबत व अपघात ग्रस्तांना वेळेवर जास्त मोबदला देणेबाबत शासन स्तरावरून काय कार्यवाही करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०६-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे. बारामती परिमंडळ अंतर्गत शिरुर तालुक्यातील संविदणे येथील लंचे मळ्यात न्युट्रलची तार तुटली होती. परंतु सदर तार तुटल्याने कोणताही अपघात झाल्याची नोंद नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) पुणे जिल्ह्यामध्ये महावितरण कंपनीकडून पुणे परिमंडळांतर्गत जुन्या वीजवाहक तारा वेळोवेळी नियमित देखभाली अंतर्गत आवश्यकतेनुसार बदलण्यात येतात. तसेच अपघातग्रस्तांना प्रचलित नियमानुसार आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता पुर्ण होताच नुकसान

भरपाई दिली जाते. तसेच बारामती परिमंडळांतर्गत काही ठिकाणी जुन्या वीज वाहक तारा आर.ए.पी.डी.आर.पी. योजनेंतर्गत बदलण्यात आल्या आहेत व पायाभूत आराखडा-२ मध्ये बदलण्यात येत आहेत. दिन दयाळ उपाध्याय ग्रामज्योत योजनेंतर्गत संविदणे गावासाठी ४ कि.मी. जुन्या तारा बदलण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यात इंदिरा आवास योजना राबविण्याबाबत

**(३) ६३२५ (०८-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व मागासवर्गीय बेघर कुटुंबियांना त्यांच्या हक्काचा निवारा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने इंदिरा आवास योजना राबविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत पुणे जिल्ह्यातील मंजुर करण्यात आलेल्या साडे सतरा हजार घरकुलांसाठी पुरेसा निधी उपलब्ध असूनही केवळ घरकुलासाठी जागा नसल्याने हि बांधकामे रखडल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१४ च्या दरम्यान जिल्हा दक्षता समितीच्या बैठकीत उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेअंतर्गत शासनाने प्रती गुंठा २० हजार रुपयांचा निधी जागा खरेदी करण्यास भुमा देऊनही इतक्या अल्प निधीत ग्रामीण भागात जागा उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे जिल्हा परिषदेने सन २०१३-१४ मध्ये शासनाकडे घरकुलांसाठी व इतर विकास कामांसाठी गावातील गायरान जागा शासकीय जागा ग्रामपंचायतींना देण्याची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासन स्तरावररुन कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०६-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

इंदिरा आवास योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील प्रतिक्षा यादीतील १८,२६३ लाभार्थ्यांकडे स्वत:ची जागा नसल्यामुळे घरकुलाचा लाभ देता येत नाही.

(३) होय.

(४) होय.

(५) इंदिरा आवास योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील प्रतिक्षा यादीतील १८,२६३ घरकुल लाभार्थ्यांना शासकीय गायरान जमीन दिर्घ मुदतीच्या भाडेपट्यावर वापरण्यास परवानगी देण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत अपर मुख्य सचिव, महसूल यांना दि. ७.६.२०१३ अन्वये प्रस्ताव सादर केला असून पाठपुरावा सुरु आहे.

तथापि, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व महसूल व वन विभागाच्या दि. १२ जुलै, २०११ च्या शासन निर्णयानुसार गायरान/गुरचरण व गावाच्या सार्वजनिक वापरातील जमीनही फक्त केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभांगामार्फत राबविण्यात येणाऱ्या सार्वजनिक सुविधा (Public Utility) व सार्वजनिक प्रयोजन (Public Purpose) यासाठी अन्य जमीन उपलब्ध नसल्यास वापर करावा असे निर्देश देण्यात आले आहेत. घरकुल योजना ही वैयक्तिक लाभाची योजना असल्यामुळे घरकुल लाभार्थ्यांना गायरान जमीन उपलब्ध होऊ शकत नाही.

महाराष्ट्र शासनाचा २०१५-१६ या वर्षाचा अर्थसंकल्प विधानसभेला सादर करतांना मा.वित्त मंत्री यांनी "पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना" घोषित केली आहे. या योजनेअंतर्गत घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसलेल्या घरकुल लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी प्रति लाभार्थी रु. ५०,०००/- इतके अर्थसहाय देण्यात येणार आहे. योजनेची रुपरेषा व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

---

**राज्यातील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या रस्त्यांची दुर्दशा दूर करण्याबाबत.**

**(४) ६३२६ (०९-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या रस्त्यांची दुर्दशा दूर करण्यासाठी व खराब रस्ते सुधारणा करण्यासाठी शासनाकडून जिल्हा परिषदेला कुठलीही तरतूद केली जात नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या धर्तीवर केंद्र सरकार तसेच नाबार्ड, हुडको यांच्याकडून स्वतंत्र निधी जिल्हा परिषदेच्या रस्त्यांसाठी उपलब्ध होत नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषदेच्या रस्त्यांना दुरुस्तीसाठी केंद्र सरकार, नाबार्ड, हुडको यांच्यामार्फत व राज्य शासनामार्फत स्वतंत्र निधी मिळण्याबाबत शासनस्तरावरुन केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सद्यस्थितीत जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांवरील पुलांची कामे काही प्रमाणात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नाबार्ड कर्ज सहाय्य योजना (ग्रामीण पायाभूत विकास निधी) अंतर्गत मंजूर करण्यात येतात. तथापि ग्रामविकास विभागाकडे सदर योजनेमधून जिल्हा परिषद रस्त्यांकरीता स्वतंत्रपणे निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे.

---

**पुणे नगर महामार्गावर कारेगाव व न्हावरे फाटा येथे एस.टी.बस थांबत नसल्याबाबत**

**(५) ६३३० (०८-०३-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे नगर महामार्गावर कारेगाव या ठिकाणी पंच तारांकित एम आय डी सी असुनही व न्हावरे फाटा येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा बस थांबा मंजुर असुनही एस टी बसेस थांबत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास कारेगाव व न्हावरे फाटा येथे एस टी बस थांबत नसल्याने कामगार व प्रवाशांची मोठी गैरसोय होते म्हणून ग्रामस्थांनी माहे डिसेंबर २०१४ च्या दरम्यान मागणीचे निवेदन मा. परिवहन मंत्री महोदयांना देण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास न्हावरे फाटा व कारेगाव येथे पुणे व नगरकडे जाणा-या सर्व बसेस थांबण्यासाठी बस थांबे मंजुर असुनही एस. टी. महामंडळाने कुठलीही पाटी लावली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व प्रवाशांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) कारेगाव एम आय डी सी येथील थांब्याबाबत श्री.नाथा शेवाळे, सदस्य राज्य ग्राहक संरक्षण परिषद महाराष्ट्र शासन यांनी मा.परिवहन मंत्री महाराष्ट्र राज्य यांना अग्रेषित केलेले निवेदन प्राप्त झालेले आहे.

(३) व (४) हे खरे नाही, बसेस थांबण्यासाठी मंजूर थांब्यावर विनंती थांबा बोर्ड लावण्यात आलेले होते परंतू रस्ता दुरुस्तीमध्ये सदर बोर्ड काढण्यात आले होते. सद्यस्थितीत पुन:श्च विनंती थांबा बोर्ड लावण्यात आलेले आहेत.

कारेगाव एमआयडीसी बस थांबा पुणे- शिरुर मार्गावर पुण्यापासून ५७.२ कि.मी. अंतरावर असून सदर ठिकाणी वाहकासह चालनात असलेल्या पुणे विभागाच्या २४ बसेस थांबून प्रवासी चट/उतार केली जाते. न्हावरेफाटा हा थांबा शिरुर पासून ३.० कि.मी. अंतरावर असून सदर ठिकाणी पुणे विभागातील फे-यांना विनंती थांबा देण्यात आलेला आहे. तसेच न्हावरेफाटा येथून शिरुर चौफुला मार्गावरील बारामती, सातारा, लोणंद, निरा, चौफुला अशा एकूण १८ फे-या चालनात असून शिरुर-पुणे मार्गावरील २४ फे-या अशा एकूण ४२ फेऱ्यांना न्हावरेफाटा येथे अधिकृत थांबा आहे. तेथे प्रवासी चढ/उतार करणेबाबत संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

**कोल्हापूर शहरातील सीपीआर व राजर्षी शाहू महाराज शासकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्यासह रुग्णालयांकरीता निधी वाढवून देण्याबाबतची केलेली मागणी**

**(६) ६३५५ (०९-०४-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील सीपीआर व राजर्षी शाहू महाराज शासकीय महाविद्यालय रुग्णालयात रुग्णांची वाढती संख्या व उपचारासाठी लागणारी साधनसामुग्री यावरील खर्च पाहता सहा कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याने उक्त प्रयोजनाकरीता निधी वाढवून द्यावा अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केल्याचे तसेच उक्त रुग्णालयातील रिक्त पदे सन २०१५ पर्यंत भरण्याचे आदेश मा. वैद्यकिय शिक्षण मंत्री यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरील रुग्णालयातील सर्व म्हणजे १२ व्हेंटिलेटर दिनांक ९ जानेवारी, २०१५ पासून बंद पडल्याने अत्यावश्यक शस्त्राक्रिया देखील बंद असून रुग्णालयातील डॉ. हिरगडे यांची बदली झाल्यामुळे सदरील रुग्णालयातील एकमेव बाल सर्जनाअभावी रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना शस्त्रक्रियेकरीता खाजगी रुग्णालयात जावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. संस्थेतील १२ व्हेंटीलेटर नादुरुस्त असले तरी संस्थेत उपलब्ध असलेले ९ व्हेंटीलेटर कार्यरत आहेत. छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय कोल्हापूर येथे बालशल्यचिकित्सक हे पद मंजूर नाही. तथापि सदर रुग्णालयात दाखल होणाऱ्या लहान मुलांच्या शस्त्रक्रियेचे रुग्ण हे बालशल्यचिकित्सक असलेल्या पदमभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली येथे पुढील उपचारासाठी संदर्भाकींत केले जातात. बालशल्यचिकित्सकांची आवश्यकता नसलेल्या अन्य शस्त्रक्रिया इतर शल्यचिकित्सामार्फत केल्या जातात. त्यामुळे एकमेव बालसर्जनाअभावी रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना शस्त्रक्रियाकरिता खाजगी रुग्णलयात जावे लागते ही बाब खरी नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हातकणंगले तालुक्यात (जि.कोल्हापूर) मंजूर झालेल्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(७) ६४०२ (१०-०४-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंगले तालुक्यात (जि.कोल्हापूर) सर्वच कार्यालय सर्व सोयीनियुक्त व एकत्रित असावीत यासाठी मंजूर झालेल्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,

(२) तसेच या इमारतीच्या बांधकामासाठी आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे व इमारतीचे बांधकाम अर्धवट राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर इमारतीचे काम त्वरीत पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१५) :**(१) प्रश्नाधीन इमारतीच्या तळमजल्याचे आर.सी.सी. व वीट बांधकाम पूर्ण झाले असून पहिल्या मजल्याचे आर.सी.सी. काम पूर्ण झाले आहे.

(२), (३) व (४) प्रश्नाधीन कामासाठी रु. २५६.५२ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे. सदर काम निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात सदर कामास उपलब्ध नियतव्ययाच्या अधीन राहून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) जवळील आजदे ग्रामपंचायतीमार्फत एमआयडीसीच्या परिसरात टाकलेल्या कचऱ्यामुळे वायु प्रदुषण होत असल्याबाबत**

**(८) ६४२२ (०६-०४-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) जवळील आजदे ग्रामपंचायतीमार्फत एमआयडीसीच्या परिसरात टाकलेल्या कचऱ्यामुळे वायु प्रदुषण होत असल्याने आजदे गाव व निवासी विभागातील घनकचरा एमआयडीसीच्या डंप्रिग ग्राऊंडवर टाकण्यास मा. पर्यावरण राज्यमंत्री यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान बंदी घातली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंदीमुळे आजदेगांव ग्रामपंचायत आणि एमआयडीसी यांच्यातील वाद चिघळला असून कच-यांची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न ग्रामपंचायतीसमोर उपस्थित झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. रामदास कदम (०२-०७-२०१५) :**(१) होय, याबाबत मा.पर्यावरण राज्यमंत्री यांनी तोंडी आदेश दिले आहेत.

(२) व (३) सदर ग्रामपंचायतीस नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी करण्याकरीता जागा उपलब्ध नसल्याने एमआयडीसीच्या मोकळ्या जागेवर नागरी घनकचरा टाकणे व जाळण्याच्या घटना घडतात याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संबंधित ग्रामपंचायत तसेच एमआयडीसी प्रशासनास योग्य सूचना देण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत मोकळ्या जागेवर कचरा टाकण्यास एमआयडीसी ने बंदी केली असून प्रस्तुत प्रकरण, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ट आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) औद्योगिक परिसरात सीसी टिव्ही कॅमेरे बसविण्याबाबत राष्ट्रीय हरित लवादाने प्रदुषण नियंत्रण मंडळाला दिलेल्या आदेशाबाबत**

**(९) ६४२४ (०६-०४-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली परिसरात मोठया प्रमाणावर रासायनिक कारखाने सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवलीतील रासायनिक कारखान्यातून रासायनिक सांडपाण्यावर योग्य प्रकारे प्रक्रिया न करता प्रदुषित पाणी थेट नैसर्गिक जलस्त्रोतात सोडले जात असल्याने परिसरातील नागरिकांच्या वसाहतीतील बोअरवेलच्या पाण्यामध्ये रासायनिक द्रव्य मिश्रित पाणी येत असून सदर रासायनिक कारखान्याद्वारे या परिसरात हवेचे व पाण्याचे प्रदूषण होत असल्यामुळे कल्याण-डोंबिवली परिसरातील स्थानिक नागरिकांनी महाराष्ट्र प्रदुषण नियामक मंडळाकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डोंबिवली औद्योगिक वसाहतीमधून उल्हास (जि.ठाणे) नदीमध्ये रासायनिक सांडपाणी बेजबाबदारपणे सोडले जात असल्याने सदर गैरप्रकारांना आळा घालण्याकरिता उल्हास नदीपात्रात तसेच डोंबिवली औद्योगिक परिसरात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने स्वखर्चाने सीसी टिव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत असा आदेश राष्ट्रीय हरीत लवादाने दिनांक २० जानेवारी,२०१५ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात कोणता निर्णय घेतला आहे वा त्यानुषंगाने सदर ठिकाणी सीसी टिव्ही कॅमेरे बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. रामदास कदम (१४-०७-२०१५) :**(१) व (२) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार हे खरे आहे.

(३) हे खरे आहे, त्यानुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने उल्हासनगर महानगरपालिकेस सीसी टिव्ही कॅमेरे बसविण्याबाबत काही प्रमाणात रक्कम देण्याबाबत मा.राष्ट्रीय हरीत लवाद यांच्याकडे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

(४) सदर बाबतीत, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिकेकडे पाठपुरावा चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विक्रोळी, मुंबई येथील एका १७ वर्षीय मुलीवर शेजारी राहणारा तरुण गेल्या तीन वर्षापासून अत्याचार करत असल्याबाबत**

**(१०) ६४३९ (०७-०४-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी, मुंबई येथील एका १७ वर्षीय मुलीवर शेजारी राहणारा तरुण गेल्या तीन वर्षापासून अत्याचार करीत असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :**(१) व (२) होय. सदर प्रकरणी फिर्यादीवरुन विक्रोळी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक १०/१५ भा.दं.वि. संहिता कलम ३७६, ५०६(२) तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम - २०१२ अन्वये दिनांक १३.०१.२०१५ रोजी गुन्हा नोंद करण्यात येऊन आरोपीस त्याच दिवशी दि. १३/०१/२०१५ रोजी तात्काळ अटक करण्यात आली आहे. तसेच आरोपीविरुध्द न्यायालयात क्र. १२०/१५ अन्वये दोषारोपत्रक दिनांक ५.३.२०१५ रोजी सादर करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई - रेवस मार्गावर जलवाहतूक संस्थांना भाडेवाढ करण्यास परवानगी दिल्याबाबत.**

**(११) ६४४२ (०७-०४-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-रेवस मार्गावर जलवाहतूक संस्थांना महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने माहे नोव्हेंबर, २०१४ पासून भाडेवाढ करण्यास परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बोर्डाचे आदेश जलवाहतूक संस्था पाळत नसतांना भाडेवाढ करण्यास मंजूरी देण्याची कारणे काय आहेत,

(३) सदर भाडेवाढीस जलवाहतूक प्रवासी संघटनेने तीव्र विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) रेवस मार्गावरील प्रवासी संख्येमध्ये झालेली घट, तसेच इंधन, कर्मचाऱ्यांचे वेतन, बोटींची देखील व दुरुस्ती इत्यादी खर्चात झालेली वाढ या बाबी विचारात घेवून तात्पुरत्या स्वरुपात भाडेवाढ मंजुर करण्यात आली आहे. याशिवाय तिकीट दर वाढीची कायमस्वरुपी कार्यपध्दती विहित करण्यासाठीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्रादेशिक परिवहन विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची ५० टक्के पदे रिक्त असल्याबाबत**

**(१२) ६४९७ (०८-०४-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रादेशिक परिवहन विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची ५० टक्के पदे रिक्त असल्याने या विभागातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडतो म्हणून सदर अतिरिक्त पदे भरण्याचा निर्णय परिवहन विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती कालावधीत सदर रिक्त असलेली पदे भरण्यात येणार आहेत तसेच मुंबई आणि पुणे या शहरात तंत्रशुध्द वाहन प्रशिक्षण केंद्रांचीही उभारणी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) अद्याप या दोन्ही प्रकरणी निर्णय वा त्याची अंमलबजावणी करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व त्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०६-२०१५) :**(१) विभागातील दिनांक ३१.०३.२०१५ अखेर रिक्त असलेली ३१.२०% पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत असून, अतिरिक्त पदे निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आलेला नाही.
(२) व (३) वेतनावरील खर्च नियमित करण्याच्या उद्देशाने वित्त विभागाने दिनांक ०२.०६.२०१५ च्या शासन निर्णयान्वये नवीन पदनिर्मितीवर बंदी आणलेली असून पदभरतीवर काही निर्बंध आणले आहेत. पदभरतीच्या अनुषंगाने प्रचलित नियम व कार्यपध्दतीत विचारात घेऊन रिक्त पदे तातडीने भरण्याचा प्रयत्न करण्यात येत असून केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजने अंतर्गत सेंट्रल इन्स्टीट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट (CIRT) पुणे येथे राज्यस्तरीय इन्स्टीट्युट फॉर ड्रायव्हिंग ट्रेनिंग ॲन्ड रिसर्च (IDTR) याची उभारणी होऊन ती कार्यान्वित करण्यात आली आहे. मुंबई परिसरात अशा केंद्राच्या उभारणीबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

---

**मुंबई उपनगरातील भांडूप (प.) येथील औद्योगिक क्षेत्राकरिता संपादित केलेल्या जमिनी मूळ मालकांना परत करणेबाबत.**

**(१३) ६५१६ (०४-०४-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील भांडूप (प.) येथील सर्व्हे क्र. ७३ (१) ते ७३/१२ व ४७/१ ते ७४/११ पर्यंतच्या औद्योगिक क्षेत्राकरिता संपादित केलेल्या जमिनीच्या मूळ उद्देषाकरिता असलेला वापर संपल्यामळे सदर जमिनी मूळ मालकांना परत करणे अथवा जमिनीच्चा योग्य मोबदला देण्याच्या संदर्भात सर्व संबंधितांची मा.महसूल मंत्री यांचेसोबत बैठक आयोजित करण्याची विनंती भांडूप (प.) मुंबई येथील लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मा.महसूल मंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात कोणती कारवाई करण्यात आली, आहे वा करण्यात येत आहे

(३) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०६-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) मा.राज्यमंत्री (महसूल) यांच्या मंत्रालयीन दालनामध्ये दि.१६.३.२०१५ रोजी सायंकाळी ४.३० वा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, उपायुक्त, पूर्व उपनगरे (बृ.म.पा.) व सहायक अभियंता (बृ.म.पा.) यांना शासनपत्र दि. २६.३.२०१५ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई, विक्रोळी येथील टागोर नगर ग्रुप नंबर दोनच्या परिसरात असलेल्या म्हाडाच्या भूखंडावर बेकायदा झोपडया आणि गोदामांनी कब्जा केल्याबाबत**

**(१४) ६५४३ (०७-०४-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, विक्रोळी येथील टागोर नगर ग्रुप नंबर दोनच्या परिसरात असलेल्या म्हाडाच्या भूखंडावर बेकायदा झोपडया आणि गोदामांनी कब्जा केल्याचे स्थानिक नागरिकांनी दि. १८/११/२०१४ रोजी वा त्या अगोदरही वारंवार म्हाडाकडे पत्रव्यवहार केला आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१५-०६-२०१५) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे . टागोर नगर विक्रोळी (पूर्व) येथे म्हाडाच्या वसाहतीतील ग्रुप नं.२, सी. टी.एस.क्र.१६२/१ हा मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारितील मोकळा भुखंड प्राथमिक शाळेकरीता राखीव आहे.

सदर भूखंड रिक्त असल्यामुळे परिसरांतील नागरिकांनी त्यावर झोपड्यांचे अतिक्रमण केले होते. सदर अतिक्रमणाबाबत स्थानिक रहिवाशी श्री.अन्सारी यानी दिनांक १४.०७.२०१० च्या पत्राने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १६.०८.२०१० रोजी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या घाटकोपर विभागामार्फत अतिक्रमण काढण्यात आले होते.

तद् नंतर सदर मोकळ्या भूखंडावर परिसरातील नागरिकांनी पुन्हा अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आल्यामुळे, सदर भूखंडावरील काही अतिक्रमण मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून दिनांक १८.१२.२०१४ ला काढण्यात आले आहे. सदरहू भूखंडावरील अतिक्रमण पोलिस बंदोबस्त घेऊन काढण्याचे पुन्हा प्रस्तावित आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील पदपथ एलईडीच्या दिव्यांनी प्रकाशमान करण्याच्या योजनेबाबत**

**(१५) ६५५१ (०६-०४-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या योजनेतून मुंबईतील पदपथ एलईडीच्या दिव्यांनी प्रकाशमान करण्याची योजना विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना कार्यान्वित करण्याचा शासनाने निर्णय घेण्यात आला आहे काय, त्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या सहभाग किती राहणार आहे व सदर योजना किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे, त्यासाठी केंद्र शासनाकडून किती निधी उपलब्ध होणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) केंद्रीय धोरणात्मक निर्णयानुसार विद्‌युत ऊर्जा बचतीसाठीची योजना महाराष्ट्रात राबविण्याकरिता मा.केंद्रीय ऊर्जा राज्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. सदर बैठकीस महाराष्ट्र शासनाचे मा.ऊर्जा नविन व नविकरणीय मंत्री, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त, महाव्यवस्थापक बी.ई.एस.टी. आणि मे.एनर्जी ईफिशियन्सी सर्विस लि. कंपनी यांना मुंबईतील दिवाबत्तीच्या खांबावर दिवे बसविण्याची परवानगी दिली. तसेच या बैठकीमध्ये प्रायोगिक तत्त्वावर मुंबईतील क्वीन नेकलेस समजल्या जाणाऱ्या मरिन ड्राईव्ह येथील नेताजी सुभाषचंद्र बोस (नरिमन पॉईंट ते तांबे चौक) मार्गावरील दिवाबत्तीच्या खांबावरील पारंपारिक दिवे बदलून एलईडी दिवे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सदरहू प्रकल्पास कोणताही आर्थिक खर्च अथवा बोजा महानगरपालिकेस सोसावा लागणार नाही, तसेच केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होणार नाही. सदर प्रकल्प राबविल्यामुळे भविष्यात विद्युत ऊर्जेची बचत होऊन विद्युत ऊर्जेवरील होणाऱ्या खर्चाच्या या बचतीतुन सदर प्रकल्पाचा खर्च भगविणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पर्यंती (ता.माण, जि.सातारा) येथील जुन्या रेकॉर्ड नोंद असलेल्या पाझर तलाव क्रं.३ मध्ये बेकायदा विहिर खोदण्याचे काम सुरू असल्याबाबत**

**(१६) ६६०१ (०७-०४-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पर्यंती (ता.माण, जि.सातारा) येथील जुन्या रेकॉर्ड नोंद असलेल्या पाझर तलाव क्रं.३ मध्ये बेकायदा विहिर खोदण्याचे काम सुरू असल्याचे याबाबतची शेतकऱ्यांनी वारंवार जिल्हा परिषद लघू पाटबंधारे व महसूल विभागाचे अधिकारी यांच्याकडे तक्रारी करून सदर विहिर खोदण्याचे काम बंद करावे व या प्रकरणी चौकशी करावी अशी मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यंती येथे रेकॉर्ड नोंद असलेला हा पाझर तलाव १९८० दरम्यान बांधून सदर तलावातील पाणी साठा हा मासाळवाडी हद्दीमधील गट नं. ९९६ लगत असलेल्या भाटकी, पर्यंती व मासाळवाडी गावातील जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी होत असल्याने पाझर तलावात खोदण्यात येणाऱ्या बेकायदा विहिरीचे काम बंद करण्याबाबत आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) अद्याप तक्रारीतील मागणीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत वा सुरू असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०७-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) तक्रारीच्या अनुषंगाने मंडल अधिकारी, मार्डी यांनी दिनांक ०९ जानेवारी, २०१५ रोजी प्रत्यक्ष ठिकाणी जावून स्थळ पाहणी केली असून सदरचे बांधकाम बंद करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. सदर विहिरीचे बांधकाम दिनांक ०९ जानेवारी, २०१५ पासून पूर्णपणे बंद करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एम.के.व्ही.डी.सी. , जी.एम.आय.डी.सी. व टी.आय.डी.सी. च्या अधिनियमात कामास लवकर प्रारंभ होण्याबाबत**

**(१७) ६६०२ (०८-०४-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एम.के.व्ही.डी.सी., जी.एम.आय.डी.सी. व टी.आय.डी.सी. च्या अधिनियमात कामास लवकर प्रारंभ होण्यासाठी कंत्राटदारांना सव्याज आर्थिक अग्रीम देण्याची तरतूद नसतांना व कंत्राटाच्या अटीमध्ये अग्रीम देण्याचीही तरतूद नसतांना तत्कालीन शासनाने पाटबंधारेच्या ३७ प्रकल्पापैकी २४ कामाच्या कंत्राटदारांना सन २००७ ते २०११ या वर्षातील कामांसाठी ४७८.९५ सुसज्जता अग्रीम दिला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अधिनियमात तरतूद नसतांनाही कंत्राटदारांना सुसज्जता अग्रीम देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, अधिनियमाबाह्य सुसज्जता अग्रीम कंत्राटदारांना देण्यासाठी जबाबदार असणाऱ्यांची शासनाने चौकशी करुन त्यांच्यावर आतापर्यंत काय कारवाई करण्यात आली आहे वा कारवाईची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

एम.के.व्ही.डी.सी. पुणे महामंडळाने शासनाची पुर्व मान्यता घेऊन सन २००७-११ मध्ये १२ कामांसाठी एकूण रु. ११.२५ कोटी इतका सुसज्जता अग्रीम दिला होता.

जी.एम.आय.डी.सी. औरंगाबाद महामंडळाने सन २००७-११ मध्ये महामंडळाच्या अध्यक्षांची मान्यता घेऊन १४ कामांसाठी एकूण रु. ४१.६८ कोटी इतका अग्रीम दिला होता. टी.आय.डी.सी., जळगाव महामंडळाने सन २००७-११ मध्ये महामंडळाच्या अध्यक्षांची मान्यता घेऊन ०३ कामांसाठी एकूण रु. १७.९६ कोटी कर्जरुपी वित्तीय सहाय्य केले होते.

(२) <u>एम.के.व्ही.डी.सी.</u>

(१) निविदापूर्व बैठकीमध्ये ठेकेदारांची अग्रीमाबाबत मागणी होती. याबाबत लवकर कळविण्यात येईल असा या बैठकीमध्ये निर्णय झाला.

(२) सदर कामे ए.आय.बी.पी. अंतर्गत असल्याने वेळेत पूर्ण करणे बंधनकारक होते.

(३) वरील बाबींचा विचार करुन शासनास प्रस्ताव पाठवून शासन स्तरावरुन त्यास मान्यता घेण्यात आली.

(४) सदर मान्यतेच्या अनुषंगाने निविदा शर्तीमध्ये अग्रीमाची शर्त अंतर्भुत करुन अग्रीम देण्यात आले.

**<u>जी.एम.आय.डी.सी.</u>**

(५) संबंधीत कंत्राटदारास महामंडळाच्या अध्यक्षांच्या पूर्व मान्यतेनंतर अग्रीम अदा करण्यात आले. कंत्राटदाराकडून अग्रीम रक्कम + व्याज एवढ्या रकमेची बँक हमी घेण्यात आली.

**<u>टी.आय.डी.सी.</u>**

(६) संबंधीत कंत्राटदारास कर्जरुपी वित्तीय सहाय्य महामंडळाच्या अध्यक्षांच्या पूर्व मान्यतेनंतर व्याजाने अदा करण्यात आले. कंत्राटदारांकडून कर्ज रक्कम + व्याज एवढ्या रकमेची बँक हमी पत्रे घेण्यात आली.

(७) कंत्राटदाराकडून सर्व रक्कम व्याजासह वसूल करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यातील शेतकरी श्रीराम सकरु राठोड या वृध्दाने दुष्काळामुळे पीक उध्वस्त झाल्याने लेखी निवेदनाद्वारे इच्छा मरणाची परवानगी मागितल्याबाबत**

**(१८) ६६११ (०७-०४-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यातील शेतकरी श्रीराम सकरु राठोड या वृध्दाने दुष्काळामुळे पीक उध्वस्त झाल्याने शासनाकडे माहे नोव्हेंबर, २०१४ वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे इच्छा मरणाची परवानगी मागितली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये बाळापूर गावात (जि.अकोला) नापीकीमुळे ओढावलेल्या आर्थिक संकटाला तोंड देणे अवघड झाल्याने वृध्द शेतकरी काशीराम भगवान इंदोरे यांनी स्वतःचिता रचून आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इच्छा मरणाची परवानगी मागणा-या शेतक-यांच्या निवेदनावर व आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या कुटुंबियांना शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०७-२०१५) :**(१) श्रीराम सकरु राठोड, ता.मालेगाव, जि.वाशिम यांनी दुष्काळामुळे पिक उध्वस्त झाल्याने इच्छा मरणाची परवानगी मागितली हे खरे नाही. परंतु प्रकल्पग्रस्त म्हणुन त्यांच्या मुलास नोकरी व जमीन मिळणेबाबत इच्छा मरणाच्या परवानगी संबंधी अर्ज केला होता.

(२) व (३) श्रीराम सकरु राठोड यांच्या मुलाने प्रकल्पग्रस्त म्हणुन शासकीय नोकरी किंवा शासकीय जमीन मिळण्याचा अर्ज केला होता. प्रचलित नियमानुसार संपादनाच्या मोबदल्याची ६५% रक्कम मोबदला मिळाल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसात जमा केल्याबाबतच्या चलान प्रतीसह विहित नमुन्यात अर्ज करण्याबाबत संबंधीतांना कळविण्यात आले होते. तथापि, त्या प्रमाणे अर्ज प्राप्त झालेला नाही.

काशिराम भगवान इंदोरे याच्या आत्महत्या प्रकरणी त्यांच्या कुटुंबियांस नियमानुसार रु.१.०० लक्ष इतकी मदत देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्र सरकारच्या योजनेअंतर्गत दारीद्रयरेषेखालील बेघर आणि झोपडपट्टीतील बीपीएल कार्ड नसलेल्या महिलांना लाभ मिळत नसल्याबाबत**

**(१९) ६६२२ (०६-०४-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माता व अर्भकाच्या मृत्युचा दर कमी करण्याच्या हेतून केंद्र सरकारच्या योजनांतर्गत दारीद्रयरेषेखालील राज्यातील महिला बीपीएल कार्ड धारकांना नियमाप्रमाणे लाभ मिळतो, परंतु ज्या महिलांना या योजनांची खरी गरज आहे अशा बेघर आणि झोपडपट्टीतील बीपीएल कार्ड नसलेल्या महिलांना लाभ का मिळत नाही अशी विचारणा मा. मुंबई हायकोर्टाने माहे नोव्हेंबर, २०१४ वा त्यासुमारास राज्य शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या जननी सुरक्षा योजना व राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानासारख्या योजना या प्रामुख्याने तळागाळातील लोकांसाठी असल्या तरी बीपीएल कार्ड नसणाऱ्यांना त्याचा लाभ मिळत नाही यासाठी राज्य शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, निर्णयाची स्वरुप काय आहे व अंमलबजावणीची सद्यस्थितील काय आहे ?

**डॉ.दीपक सावंत (०९-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) जननी सुरक्षा योजनेंतर्गत बीपीएल कार्ड नसणाऱ्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्याबाबत शासन परिपत्रक दि. २२/१२/२००६ नुसार, ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांकडे बीपीएल कार्ड उपलब्ध नसल्यास, त्या भागातील संबंधित तहसीलदार/तलाठी किंवा ग्रामपंचायतीने दिलेले प्रमाणपत्र/पुरावा ग्राह्य धरण्यात येते. तसेच शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांकडे बीपीएल कार्ड उपलब्ध नसल्यास, त्या प्रभागाचे प्रभाग अधिकारी किंवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी, नगरसेवक यांनी दिलेले प्रमाणपत्र पुरावा ग्राह्य धरण्याबाबत विचारात घेतले जाते व त्याप्रमाणे लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चास-कमान (ता.खेड, जि.पुणे) डाव्या कालव्याच्या अस्तरीकरणबाबत**

**(२०) ६६२४ (०६-०४-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चास-कमान (ता.खेड, जि.पुणे) डावा कालव्याचे अस्तरीकरण झालेले नसल्याने कालव्यातील पाण्याची गळती होवून कालव्यालगतच्या जमीनी नापीक होत असल्याने स्थानिक खासदार व आमदारांनी कालव्याच्या अस्तरीकरणासाठी जलसंपदा विभागाकडे निवेदने पाठवून वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याच्या अस्तरीकरणाबाबत आतापर्यंत कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत व कालव्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणा-या ठेकेदारावर काय कारवाई करण्यात आली आहे,
(३) असल्यास, कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम व निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणा-या ठेकेदाराविरुध्दची कारवाई किती कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५)** :(१) अंशत: खरे आहे. चासकमान डाव्या कालव्याचे अस्तरीकरण पूर्ण झालेले नाही. कालव्यातील पाण्याच्या गळतीमुळे जमीनी नापिक होत असल्याबाबत स्थानिक खासदार व आमदार यांचे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(२) डाव्या कालव्यावरील उर्वरित कामे व अस्तरीकरण कामाची निविदा २००६-०७ मध्ये निश्चित करण्यात आली. सिंचनाच्या मागणीमुळे कालवा प्रवाही ठेवावा लागतो त्यामुळे अस्तरीकरणाचे काम करण्यासाठी बंद कालावधी मिळत नाही. चासकमान प्रकल्पाच्या कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी सन २०१३-१४ पासून बंद आहेत. चासकमान कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे ठेकेदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्रार्थनास्थळांवर कारवाई करण्याचे न्यायालयाने आदेश दिल्याबाबत

**(२१) ६६३८ (०६-०४-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुमारे १९ हजार ७१४ प्रार्थनास्थळांवर कारवाई करण्याचे आदेश मा.न्यायालयाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या प्रार्थनास्थळांवर कारवाई करतांना धार्मिक भावना दुखावू नये याकरिता कोणती दक्षता घेतली वा घेण्यात येत आहे,
(३) तसेच सदरच्या प्रार्थनास्थळांना पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन विचार करणार आहे काय,
(४) नसल्यास, त्याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत (एम.आय.डी.सी) राज्यात नव्या उद्योग प्रकल्पांना नुकतीच मान्यता देण्यात आल्याबाबत**

**(२२) ६६४२ (०९-०४-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत (एम.आय.डी.सी) राज्यात १३० नव्या उद्योग प्रकल्पांना नुकतीच मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या उद्योगामुळे राज्यात किती रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे व प्रत्यक्षात किती कामगारांना रोजगार उपलब्ध होणेची अपेक्षा आहे,

(३) असल्यास, उपरोक्त उद्योग राज्यात कोणत्या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत व त्याच्या उभारणी कामांची सुरुवात झाली आहे काय,

(४) असल्यास, अदयापही या उद्योगांच्या उभारणीच्या कामात सुरुवात झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०६-२०१५) :**(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून प्रकल्पांना मान्यता देण्यात येत नाही. परंतू, सन २०१४ पासून आतापर्यंत २५० नविन उद्योजकांना भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे.

(२) २५० नविन उद्योजकांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडांवर एकूण ४११६.३४ कोटी इतक्या रक्कमेची गुंतवणूक होणार असून, त्यामधून १९४९६ लोकांना रोजगार मिळणे अपेक्षित आहे.

(३) सदरहू प्रकल्पांना महामंडळाच्या वेगवेगळया ठिकाणच्या औद्योगिक क्षेत्रात भूखंड वाटप करण्यात येत आहे. तथापि भूखंड वाटपानंतर प्रत्यक्ष उद्योग उभारणीसाठी विकास कालावधी देण्यात येतो. त्याप्रमाणे उद्योजकांकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे आणि पालघर जिल्ह्यांत सिंचन विहिरी अपुर्ण स्थितीत असल्याबाबत.**

**(२३) ६६५५ (०६-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आणि पालघर जिल्ह्यांत सिंचन विहिरी अपुर्ण स्थितीत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबरनाथ, भिवंडी, कल्याण, मुरबाड आणि शहापुर या तालुक्यात किती सिंचन विहिरी अपु-या आहेत,

(३) असल्यास, या सिंचन विहिरी पुर्ण करण्याकरिता शासनानी कोणती उपाययोजना आखली आहे,

(४) या सिंचन विहरींकडे दुलर्क्ष करणा-या अधिका-यांवर कोणती कार्यवाही करणार आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) अंबरनाथ -१६ विहिरी, भिवंडी- १५६ विहिरी, कल्याण -२२ विहिरी, मुरबाड-३३८ विहिरी, व शहापूर १०८ विहिरी अशा एकूण ६४० विहिरी अपूर्ण आहेत.
(३) अपूर्ण सिंचन विहिरी पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषद मार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच अपूर्ण विहिरींची कामे तात्काळ पूर्ण करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.ठाणे यांनी सर्व गट विकास अधिकारी व कार्यकारी अभियंता यांना आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे १०० सिंचन विहीरीसाठी -१ याप्रमाणे भिवंडी-१, शहापूर-१, मुरबाड-३ अशा एकूण ५ तांत्रिक अधिकारी (स्थापत्य) यांची नेमणूक जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आली आहे. त्यांचेकडून विहीत कालावधीत विहीरी पूर्ण करण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेच्या अपंग कल्याणकारी योजनांबाबत**

**(२४) ६६५७ (०७-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अपंग कल्याणकारी योजनांसाठी ठाणे महानगरपालिकेने किती निधी खर्च करण्यात आला आहे,
(२) असल्यास, महानगरपालिकेकडे अपंगाची यादी उपलब्ध आहे काय,
(३) असल्यास, किती अपंगाना या योजनेचा लाभ देण्यात आला व येणार आहे,
(४) अपंगांच्या नोंदणी करीता तसेच त्यांना कल्याणकारी योजनेचा लाभ देण्याकरीता कोणती उपाययोजना तयार केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५) :**(१) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये रक्कम रुपये १.०७ कोटी खर्च करण्यात आली आहे.
(२) होय.
आरोग्य विभागामार्फत ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली अपंगाचे सर्वेक्षणाचे माहे मे, २०१४ पासून काम सुरु असून आजपर्यंत २६१ इतके अपंग सर्वेक्षणात आढळले आहेत ती यादी उपलब्ध आहे.
(३) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये ४०६ अपंगाना लाभ देण्यात आला आहे. प्रत्येक वर्षामध्ये योजनाची स्थानिक वर्तमान पत्रामध्ये अपंग कल्याणकारी योजनेची जाहिरात देऊन विनामुल्य अर्ज वितरित करण्यात येते. जे अपंग विहित अटी शर्तीची पुर्तता करतील त्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

(४) ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रभाग समिती स्तरावर अपंग व्यक्तीची नोंद करण्यासाठी अपंग नोंद रजिस्टर जन्म-मृत्यु विभागामध्ये ठेवण्यात आले आहे. त्या माध्यमातून सर्व प्रभाग समिती स्तरावर अपंगाची नोंदणी करण्याचे काम सुरु आहे. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षापासून ठाणे महानगरपालिकेने नि:समर्थ व्यक्ती कल्याणकारी पंचवार्षिक योजनेचा ठराव पारित केला असून पुढील कालावधीसाठी नि:समर्थ व्यक्तींच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येणार आहे.

---

**कल्याण शहरात निर्मल स्वच्छता अभियान अंतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयाची अत्यंत दुरावस्था झाल्याबाबत**

**(२५) ६६६२ (०७-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण शहरात (जि.ठाणे) निर्मल स्वच्छता अभियान अंतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयाची अत्यंत दुरावस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शौचालयांच्या देखभाली करीत नेमण्यात आलेले व्यवस्थापक मंडळे यांच्याकडून पाणी बिले व विद्युत बिलांची थकबाकी वसुल झालेली नसल्याने पाणी व लाईट अभावी या शौचालयाचा वापर केला जात नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, देखभाल करण्यासाठी नेमलेल्या व्यवस्थापक मंडळे नागरीकांच्या आरोग्याशी खेळत असल्याने त्यावर कोणत्या प्रकारे कारवाई करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, नागरिकांच्या हितार्थ या शौचालयात पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा विनामुल्य करण्याकरिता शासनाकडून कोणत्या प्रकारे कार्यवाही करण्यात येत आहे वा येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१५) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) निर्मल स्वच्छता अभियानांतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत बांधण्यात आलेल्या शौचालयांची पाणी/विद्युत देयके तसेच या शौचालयांची देखभाल-दुरुस्ती त्या परिसरातील नागरिकांच्या सामूदायिक तत्त्वावर स्थापन केलेल्या संघटनांनी (सी.बी.ओ.) स्वखर्चाने करावयाची होती. सदर शौचालयांच्या वापरापोटी नाममात्र शुल्क आकारुन त्यातून विद्युत देयकांची अदायगी व शौचालयांचे परिरक्षण करण्याची संकल्पना होती.

महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाकडून व्यापारी तत्त्वावर आकारलेले वीज दर, तसेच शौचालय वापर शुल्क देण्यास काही नागरिकांकडून होणारा विरोध यामुळे शौचालयांची देखभाल व दुरुस्ती, दैनंदिन स्वच्छता याकरीता येणारा खर्च व त्या तुलनेत वीज/पाण्याच्या देयकांची रक्कम याचा ताळमेळ बसत नाही. त्यामुळे बहुतांश शौचालय चालक हे काम सोडून गेले आहेत.

ज्या शौचालयांची देखभाल-दुरुस्ती संबंधित सामुदायिक तत्त्वावरील संघटनांकडून केली जात नाही, अशा शौचालयांची देखभाल-दुरुस्ती पालिकेच्या त्या-त्या प्रभागातील सफाई कामगारांमार्फत करण्यात येत आहे. सद्यस्थितीत प्रभागनिहाय किरकोळ शौचालय दुरुस्तीची निविदा प्रक्रिया पालिकेमार्फत सुरु आहे.
(४) शौचालयांना वीज व पाणी पुरवठा करण्याकरीता धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

---

**कल्याण पूर्व विभागातील गिता हरिकीसनदास दलाल रुग्णालयात प्रसुती विभागाची सेवा उपलब्ध होण्याबाबत**

**(२६) ६६६३ (०८-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण पूर्व (जि.ठाणे) विभागातील गिता हरिकीसनदास दलाल रुग्णालयात प्रसुती विभाग सेवा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण पूर्व विभागामधील लोकसंख्या व विस्तार लक्षात घेता गेल्या ५ वर्षापासून स्थानिक लोकप्रतिनिधी सुसज्ज रुग्णालयाची मागणी करत आहेत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आरोग्य विषयक गरजा भागविण्यासाठी गिता हिरकीसनदास दलाल रुग्णालयात कोणकोणत्या अत्यावश्यक सेवा उपलब्ध करण्यात येणार आहेत,
(४) असल्यास, रुग्णालय सुरु करणे व या रुग्णालयात सेवाभावी संस्थांना गाळे, जेनेरिक मेडीकल स्टोर्स, सवलतीच्या दरात वैद्यकिय चाचण्या उपलब्ध करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१५) :**(१) व (२) होय.
(३) महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी गिता हरकिसनदास दलाल रुग्णालयामध्ये दि.१५/०५/२०१५ पासून बाह्यरुग्ण सेवा (ओ.पी.डी.) सुरु करण्यात आलेली आहे.

या रुग्णालयामध्ये जनरल ओ.पी.डी., ए.एन.सी. ओ.पी.डी., क्षयरोग तपासणी व औषधोपचार, आय.सी.टी.सी.सेंटर, प्रयोगशाळा तपासणी लॅब, गरोदर माता व बालकांचे लसीकरण इत्यादी सेवा नागरिकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. सदर रुग्णालयाचा भविष्यात सुतिकागृह म्हणून वापर करण्याचा महानगरपालिकेचा मानस असल्याने या रुग्णालयात अपघात कक्ष व शवविच्छेदन इत्यादी सेवा उपलब्ध करुन देणे प्रस्तावित नाही.

(४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र.५४, दि.२०/८/२०११ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार ७ व्यापारी गाळ्यांचा वापर आवश्यकतेनुसार वाणिज्य धर्तीवर अथवा महापालिका स्तरावर चालविण्यासाठी करण्यात येणार आहे.

सदर रुग्णालयाच्या इमारतीमधील ७ व्यापारी गाळ्यांपैकी ३ गाळे आरोग्य विभागासाठी राखीव असून उर्वरित ४ गाळ्यांचा वापर रुग्णालयाशी संबंधित सोयी सुविधांकरीता, सेवाभावी संस्थांना देण्याकरिता व त्यामध्ये जेनेरिक मेडीकल स्टोर्स, सवलतीच्या दरात वैद्यकीय चाचण्या उपलब्ध करुन देण्यासंदर्भात महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (पूर्व), जि. ठाणे या भागामधील तिसगांव, आनंदवाडी, अशोक नगर, वालधुनी, सिध्दार्थ नगर, कर्पेवाडी या परिसरात तिव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(२७) ६६६६ (०७-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (पूर्व), (जि.ठाणे) येथील तिसगांव, आनंदवाडी, अशोक नगर, वालधुनी, सिध्दार्थ नगर, कर्पेवाडी या परिसरात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात अनेक ठिकाणी गटारातून जाणाऱ्या पाण्याच्या पाईप लाईन लिकेज झाल्यामुळे दुषित पाणी पुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तीव्र पाणी टंचाईवर मात तसेच दुषीत पाणी पुरवठा यावर शासनाकडून कोणत्या प्रकारची कार्यवाही करण्यात येत आहे वा येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५) :**(१) नाही.

(२) हे खरे नाही.

या भागातील जीर्ण झालेल्या जलवाहिन्या दुषित पाण्याच्या संपर्कात येतात. मात्र त्या महानगरपालिकेकडून तातडीने बदलण्यात येतात.

(३) कल्याण पूर्व भागात पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून तीन जलकुंभ उभारण्यात आले आहेत. या जलकुंभाच्या माध्यमातून पाणी वितरण विभागणी करण्यात येते. त्यामुळे पाणी टंचाईची समस्या दूर झाली आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील विभागातील पाण्याचे नमुने महानगरपालिकेकडून शासकीय प्रयोगशाळेत तापसणीकरीता पाठविण्यात येतात. जानेवारी, २०१५ ते एप्रिल, २०१५ या कालावधीत महानगरपालिकेकडून पाण्याचे एकूण २२० नमुने शासकीय प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. या सर्व नमुन्यातील पाणी पिण्यास योग्य असल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तंत्र शिक्षण संचालनालयामध्ये २६०५ जागा रिक्त असल्याबाबत

**(२८) ६७०० (०८-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तंत्रशिक्षण संचालनालयामध्ये २६०५ जागा रिक्त असल्यामुळे राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील अध्यापक वर्ग, त्यांच्या जागा, प्रयोग शाळा तसेच अन्य सोयी सुविधा किती आहेत याची तपासणी करणे तंत्रशिक्षण संचालनालयास शक्य नसल्याचे संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांनी माहे जुलै, २०१४ मध्ये शासनास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार तंत्रशिक्षण संचालनालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील कंत्राटी तत्वावरील ६५ व शासकीय तंत्रनिकेतनामधील कंत्राटी तत्वावरील ३७९ शिक्षकीय पदांच्या सेवा नियमित करण्यात आल्या आहेत. तसेच उपरोक्त महाविद्यालयांमधील रिक्त जागा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारित येणा-या ५० हून अधिक अभियांत्रिकी महाविद्यालय यांनी संलग्नता समिती नियुक्त न केल्याबाबत

**(२९) ६७०१ (०८-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारित येणा-या ५० हून अधिक अभियांत्रिकी महाविद्यालय यांनी संलग्नतेसाठी आवश्यक ती फी मुंबई विद्यापीठाकडे सन २०१०-११ पासून जमा करुनही मुंबई विद्यापीठाने संलग्नता समिती नियुक्त न केल्याने अभियांत्रिकी महाविद्यालयातील सोयीसुविधांची चौकशी करुन संलग्नता देण्यात न आल्याने सदर महाविद्यालयांची नावे कॅप प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करता न आल्याने त्या महाविद्यालयातील प्रवेशापासून विद्यार्थ्यांना वंचित रहावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबई विद्यापीठातील संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच याबाबत संचालक उच्च व तंत्रशिक्षण यांनी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ यांना पाठविलेल्या पत्राचा खुलासा करण्यात आला आहे काय, असल्यास त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०३-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) प्रश्न उदभवत नाही.
(४) याबाबत कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांना पत्र प्राप्त झालेले नाही. परंतु तंत्रशिक्षण संचालनायाकडून विद्यापीठाच्या बी.सी.यु.डी. संचालकांना प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना संलग्निकरण देणेबाबतच्या दि. २३ मे २०१४ च्या पत्रातील सर्व निर्देश काटेकोरपणे पाळण्यात येऊन शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयात स्थानिक चौकशी समित्या पाठविण्यात आल्या व ५६ अभियांत्रिकी महाविद्यालयात तात्पुरती संलग्नता वेळेत देण्यात आली.

---

**राज्यातील २७ अभियांत्रिकी महाविद्यालयातील त्रुटी दूर करण्याबाबत**

**(३०) ६८३६ (०९-०४-२०१५). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २७ अभियांत्रिकी महाविद्यालयातील त्रुटी दूर करण्याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने सन २००२ साली कळवून सहा वर्षाची मुदत दिलेली असतानाही, सदर त्रुटीची पूर्तता महाविद्यालयाने सन २०१४ पर्यंत न केल्याने त्यांना सन २०१४-१५ या वर्षासाठीच्या प्रवेश प्रक्रियेतून बाद ठरविण्यात आल्याचे माहे जून, २०१४ मध्ये वा त्या सुमारास सदर महाविद्यालयांना कळविण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, कोणकोणत्या गंभीर त्रुटी शासनाच्या निदर्शनास आल्या, सदर त्रुटी निदर्शनास आल्या असतानाही सदरहू महाविद्यालयांना शासनाने मान्यता देण्याची कारणे काय आहेत,
(४) उक्त प्रवेश प्रक्रियेतून बाद ठरविण्यात आलेल्या महाविद्यालयांची नावे काय आहेत व त्या महाविद्यालयांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०७-२०१५) :**(१) होय,

(२) व (३) तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत अभियांत्रिकी व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये प्रामुख्याने विहित मानकांनुसार अध्यापक नसणे ही प्रमुख त्रुटी आढळून आली आहे.

सदर संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ च्या प्रवेश प्रक्रियेतून बाद ठरविल्यानंतर सदर संस्थांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. मा. उच्च न्यायालयाने तक्रारकर्त्या संस्थांना प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्याचे अंतरिम आदेश दिल्यामुळे प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यांत आले.

(४) उक्त प्रवेश प्रक्रियेतून बाद ठरविण्यात आलेल्या महाविद्यालयांची नावे खालील प्रमाणे आहेत:-

(१). लोकमान्य टिळक अभियांत्रिकी महाविद्यालय, नवी मुंबई व इतर १ संस्था

(२). एस.आय.ई.एस. ग्रॅज्युएट स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी, नेरुळ, नवी मुंबई व संस्थेच्या इतर २ संस्था

(३). श्रीमती इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोपरखैराणे, नवी मुंबई

(४). एन.वाय.एस.एस. चे दत्ता मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग,ऐरोली, नवी मुंबई व इतर १ संस्था

(५). वाटुमल इन्स्टिटयुट ऑफ इलेक्ट्रानिक्स इंजिनिअरींग, वरळी, मुंबई

(६). मत्सोदरी शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, जालना

(७). एस.एन.डी.टी. विद्यापीठाचे उषा मित्तल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई

(८). कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, सातारा

(९). सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, खारघर, नवी मुंबई व संस्थेच्या इतर २ संस्था

(१०). महात्मा एज्युकेशन सोसायटीचे पिल्लई कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, न्यू पनवेल व संस्थेच्या इतर ४ संस्था

(११). तेरणा पब्लीक चॅरिटेबल ट्रस्टचे तेरणा पॉलीटेक्नीक, नवी मुंबई

(१२). जवाहर एज्युकेशन सोसायटीचे अण्णासाहेब चुडामन कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, खारघर,मुंबई

(१३). एम. जी. एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, नवी मुंबई व इतर १ संस्था

(१४). के.सी. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट स्टडीज, ठाणे व इतर २ संस्था

(१५). पद्मभूषण वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, चुनाभटटी, सायन, मुंबई व १ संस्था

या महाविद्यालयाची चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, संबंधित विद्यापीठे तसेच शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांना शासनातर्फे कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई क्षेत्रात पॅरामेडिकल आणि नर्सिंग कॉलेजची निर्मिती करणेबाबत

**(३१) ६९२७ (०९-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई क्षेत्रात अनेक शैक्षणिक संस्था कार्यरत असल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्याही मोठ्या प्रमाणावर असून त्यांना पॅरामेडिकल व नर्सिंग कॉलेजमध्ये सहजरित्या प्रवेश मिळण्यासाठी नवी मुंबईत पॅरामेडिकल व नर्सिंग कॉलेजची निर्मिती करण्यात यावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री महोदयांना माहे जानेवारी वा फेब्रुवारी, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनस्तरावर पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) निवेदनातील विनंतीबाबत तपासणी करण्यात येत आहे.

---

## वाडा तालुक्यातील कोंढले वीज उपकेंद्राचे काम बंद करण्यात आल्याबाबत

**(३२) ६९४९ (०४-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा तालुक्यातील डी प्लस झोनमुळे उद्योगधंदे वाढल्याने कोंढले येथे वीज उपकेंद्राचे सुरु करण्यात आलेले काम कंत्राटदाराने बंद केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काम अर्धवट अवस्थेत सोडून देण्यात आल्यामुळे वाडा तालुक्यातील उद्योजक व नागरिकांना वीज वितरण सुस्थीतीत ठेवणे अशक्य झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त उपकेंद्राचे काम तातडीने सुरु करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०६-२०१५) :**(१) होय.

(२) नाही.

(३) सदरहू उपकेंद्राचे उर्वरित काम नवीन कंत्राटदाराकडून सुरु असुन नोव्हेंबर, २०१६ पर्यंत उपकेंद्र कार्यान्वित करण्यास महापारेषण कंपनी प्रयत्नशील आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील नोकरी करणाऱ्या महिलांकरिता निवास व्यवस्थेसाठी महिला वसतीगृहाची स्थापन करणेबाबत**

**(३३) ६९६४ (०७-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील महिला विविध ठिकाणी नोकरीच्या निमित्ताने जात असतात, कित्येक महिलांना राहण्यासाठी स्वतःचे घर नसल्यामुळे अशा महिलांची अत्यंत गैरसोय होते. आजच्या महागाईच्या काळात स्वतःचे घर विकत घेणे न परवडणारे असल्यामुळे अशा महिलांची राहण्याची व्यवस्था व्हावी याकरिता नवी मुंबईत एखादे महिला वसतीगृह बांधण्यात यावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महिला व बाल कल्याण मंत्री महोदयांना जोनवारी, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने वसतिगृह बांधण्याबाबत शासन स्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) अद्यापि कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :**(१) होय.

(२) ठाणे जिल्ह्यासाठी नोकरी करणाऱ्या महिलांसाठी चार वसतिगृहे कार्यरत आहेत. यामध्ये ६२८ नोकरदार महिला लाभ घेत आहेत. याशिवाय न्यू पनवेल, नवी मुंबई येथे १२०० स्क्वे.मिटर आणि कोपरखैरणे येथे १८०० स्क्वे.मिटर असे दोन भूखंड उपलब्ध झालेले आहेत. सदरील भूखंड ताब्यात घेऊन त्यावर नोकरदार महिलांसाठी वसतिगृह बांधण्याबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ऐरोली एम.आय.डी.सी. परिसरातील आदिवासी वस्त्यांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(३४) ६९७३ (१०-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली एम.आय.डी.सी. क्षेत्रातील इलठणपाडा, दिघा, चिंचपाडा, ऐरोली, गवतेवाडी, संभाजीनगर (कातकरीपाडा) घणसोली, रबाळे, खैरणे, अडवली, भूतवली या भागात फार पूर्वीपासून आदिवासी कुटुंबे वास्तव्य करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात अद्यापी कोणत्याही नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदिवासी वस्त्यांमध्ये नागरी सुविधा त्वरीत पुरविण्यात याव्यात म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.आदिवास विकास मंत्र्यांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१६-०७-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) या भागात सन २००५-०६ ते सन २०१३-१४ या कालावधीत दलित वस्ती सुधार योजना, स्थानिक विकास निधी, प्रभाग निधी, आदी स्त्रोतामधून जवळपास ६५ कामे करण्यात आली असून त्यावर रु.८४२.८१ लक्ष खर्च करण्यात आलेला आहे. नळ पाणीपुरवठा, शौचालय, रस्ता, दिवाबत्ती, शाळा इत्यादी नागरी सुविधा नवी मुंबई महानगरपालिकेव्दारे पुरविण्यात आलेल्या आहेत. शिवाय, घरकुल योजनेंतर्गत घरे बांधून देण्यात आली आहेत. त्यामुळे नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत हे खरे नाही.
(३) असे कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात नर्सरी व पहिलीमध्ये शिक्षण प्रवेशाबाबत**

**(३५) ६९८२ (०९-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नर्सरी व पहिलीमध्ये शिक्षण प्रवेशासाठी दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी शासनाने नर्सरीच्या विद्यार्थ्यांचे वय ३ वर्षे व पहिल्या इयत्तेत प्रवेश घेण्यासाठी ५ वर्ष २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून निर्णय घेतलेला असुन सन २०१६-१७ मध्ये ५ वर्ष ४ महिने, सन २०१७-१८ मध्ये ५ वर्ष ८ महिने तर २०१८-१९ मध्ये पुर्ण ६ वर्ष वयाची अट नविन शैक्षणिक वर्षापासून लागू केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नर्सरी व पहिलीच्या प्रवेशासाठी सन २०१५-१६ नंतर विसंगत वयोमर्यादा ठेवण्याची कारणे काय आहेत,
(३) उक्त शासन निर्णयापुर्वी हजारो रुपये शुल्क भरुन खाजगी शाळांमध्ये प्ले ग्रुप व नर्सरीत प्रवेश घेतलेल्या तीन वर्षाखालील बालकांचे भवितव्य या निर्णयामुळे धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) प्रश्न भाग (१) व (३) बाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१५)** :(१), (२), (३), (४) व (५) माने समितीने केलेल्या शिफारशीनुसार पूर्व प्राथमिक व पहिलीच्या वर्गात प्रवेश देण्यासाठी दिनांक २१/१/२०१५ च्या शासन निर्णयान्वये वयोमर्यादा निश्चित करण्यात आली असून दि.२३/१/२०१५ च्या शुध्दीपत्रकान्वये सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येणार आहे.

---

**पालघर जिल्हयातील जव्हार तालुक्यातील कुपोषणाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाबाबत**

**(३६) ७०२७ (०९-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील जव्हार तालुक्यातील कुपोषणाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मा.राज्यपालांच्या सुचनेनूसार 'कुपोषण मुक्तीसाठी' पथदर्शी प्रकल्प राबिवण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी राबविण्यात येणा-या पथदर्शी प्रकल्पाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०७-२०१५)** :(१) हे खरे आहे.

(२) पालघर जिल्हयातील जव्हार तालुक्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प जव्हार-१ मध्ये कुपोषणावर नियंत्रण आणण्यासाठी प्रशिक्षण व पर्यवेक्षणाचा प्रकल्प मा.राज्यपाल यांचे सुचनेसार आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय दि.२१ नोव्हेंबर, २०१३ अन्वये राबविण्यात येणार आहे.

सदर प्रकल्पातंर्गत जिल्हयातील महिला आणि ६ वर्षाखालील बालकांच्या पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजना व आरोग्य विभागातील ८० अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षकांचे प्रशिक्षण देऊन इतर विभागातील ग्रामसेवक,तलाठी, शालेय शिक्षक, पोलीस पाटील व वन विभागातील कर्मचारी असे एकूण ४०० अधिकारी/ कर्मचाऱ्यांना कुपोषणाची समस्या हाताळण्याबाबतचे प्रोत्साहनात्मक प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे व पालघर जिल्ह्यंतील ३३ ग्रामपंचायती, नगरपालिका व नगरपंचायती स्थापन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३७) ७०५४ (०७-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यंतील ३३ ग्रामपंचायती, नगरपालिका व नगरपंचायती स्थापन करण्यासाठीचे प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच परिसरातील वाढती लोकसंख्या, मुलभूत सुविधांचा अभाव, अपुरी पडत असलेल्या यंत्रणेचा विचार करता सदरचे प्रस्ताव लवकरात लवकर मंजुर केले जावेत याकरिता सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) शासन अधिसूचना नगर विकास विभाग दिनांक १ मार्च, २०१४ अन्वये राज्यातील १३३ तालुका मुख्यालय ग्रामपंचायतींचे रुपांतर नगर पंचायतीमध्ये करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरुन ठाणे जिल्ह्यातील शहापूर व मुरबाड ग्राम पंचायतींचे रुपांतर नगर पंचायतीमध्ये करण्यात आले आहे. पालघर जिल्ह्यातील मोखाडा, तलासरी, वाडा व विक्रमगड या तालुका मुख्यालयांच्या ग्रामपंचायतीचे रुपांतर नगर पंचायतीमध्ये करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

---

**धामापूर (ता.मालवण जि.सिंधुदुर्ग) येथील प्रसिध्द निसर्ग पर्यटन केंद्रास पर्यावरण मंत्रालयाकडून परवानगी मिळणेबाबत**

**(३८) ७०६१ (०८-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामापूर (ता.मालवण जि.सिंधुदुर्ग) येथील प्रसिध्द निसर्ग पर्यटन केंद्रास पर्यावरण मंत्रालयाकडून परवानगी द्यावी अन्यथा सदरचे पर्यटन केंद्र पाडण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी दिलेल्या आदेशाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार निसर्ग पर्यटन केंद्र सुरळीत चालावे याकरिता आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०६-२०१५) :**(१) जनहित याचिका क्र. ९७/२०१० मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने धामापूर येथील निसर्ग पर्यटन केंद्र पाडण्याचे आदेश दिनांक १७/१२/२०१४ रोजी दिले हे खरे आहे.

(२) मा.न्यायालयाने दि.१९/१२/२०१४ चे आदेशनाने जनहित याचिका क्र.९७/२०१०मधील d(ii) प्रमाणे याचिकाकर्त्याची निसर्ग पर्यटन केंद्र पाडून वनक्षेत्र पूर्ववत करण्याचे निर्देश प्रतिवादींना द्यावेत ही विनंती मान्य केली. तथापि, हे आदेश दोन महिन्याचा कालावधी संपल्यानंतर कार्यान्वित होतील व या कालावधीत केंद्र शासनाने अंतिम आदेश दिल्यास हे आदेश कार्यान्वित होणार नाहीत असे निर्देश दिले. मा.न्यायालयाने दि.१७/१२/२०१४ चे आदेशाने केंद्र शासनाने अंतिम मान्यता दिलेली नसल्याने दि.१९/०९/२०१४ चे आदेश कार्यान्वित झाले असून, निसर्ग पर्यटन केंद्र पाडण्याचे काम १ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यात यावे. असे निर्देश दिले. केंद्र शासनाने दि. १२/०१/२०१५ चे पत्राने या प्रकल्पासाठी वनक्षेत्र वळतीकरणास अंतिम मान्यता दिली. सदर वस्तुस्थिती मा.न्यायालयाचे निदर्शनास आणून दिल्यानंतर मा.न्यायालयाने दि. ०३/०२/२०१५ चे आदेशान्वे निसर्ग पर्यटन केंद्र पाडण्याचे दि. १७/१२/२०१४ चे आदेशाची अंमलबजावणी पुढील तारखेपर्यंत करु नये तसेच केंद्र शासनाच्या अंतिम मान्यता पत्रातील पर्यायी वनीकरणासह सर्व अटींची पुर्तता दोन महिन्यात करण्याचे निर्देश दिले . पर्यायी वनीकरणाकरिता रोपाची लागवड पावसाळ्यात करणे योग्य असल्याने सदर अटीची पुर्तता करण्यासाठी जुलै, २०१५ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यास मा.न्यायालयास विनंती करण्यात आली आहे. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भांडूप परिमंडळांतर्गत ठाणे, कळवा, मुंब्रा इ. ठिकाणी वीज सुधारणेची सुरु असलेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(३९) ७०६९ (०४-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप परिमंडळांतर्गत ठाणे, कळवा, मुंब्रा इ. ठिकाणी वीज सुधारणेची सुरु असलेली कामे निकृष्ट दर्जाची असून यामध्ये वरिष्ठांच्या संगनमताने सुरु असलेल्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ऊर्जामंत्री यांचेकडे दिनांक १५ जानेवारी, २०१४ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधरण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-०७-२०१५) :**(१) होय.
(२) ठाणे, कळवा, मुंब्रा, इ. ठिकाणी आर-एपीडी आरपी योजनेअंतर्गत मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर यांनी आतापर्यंत पुर्ण केलेल्या कामाच्या दर्जाच्या तपसणी मे.आर.ई.सी. इंडिया ह्या त्रयस्थ शासकीय कंपनीमार्फत केली जाते. सदर कंपनीकडून कामाच्यादर्जाचे अहवाल अधिक्षक अभियंता (पायाभुत आराखडा) यांना प्राप्त झाल्यानंतर, त्यांनी दर्शविलेल्या त्रुटीची दुरुस्ती, मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीमार्फत करण्यात येते.

सदर एजन्सीने कामाची गती न वाढविल्यामुळे महावितरण कंपनीमार्फत दि.०५.०२.२०१५ च्या पत्रान्वये 'नोटीस टू करेक्ट' सुध्दा दिलेली आहे.

कार्यकारी संचालक (प्रकल्प) सांघिक कार्यालय यांनी दि.२८.०२.२०१५ रोजी इतर अधिकारी व मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या अधिका-यांच्या सोबत आढावा बैठक घेऊन, त्यांना सदरील कामे त्वरीत पूर्ण करण्याच्या सुचना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मुस्लीमांना शैक्षणिक सुविधा तसेच नोकऱ्यांमध्ये पाच टक्के आरक्षण देण्याबाबत**

**(४०) ७०७० (०४-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुस्लीमांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे, शिक्षणासहित नोकऱ्यांमध्ये पाच टक्के आरक्षण देण्यासाठी सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधींनी राज्यातील विविध ठिकाणी आंदोलने केलेली असून माहे जानेवारी, २०१४ च्या पहिल्या आठवड्यात तसेच वारंवार शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी सादर केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लीम समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण व नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्यासंदर्भात सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०६-२०१५) :**(१) व (२) शैक्षणिक व सामाजीक दृष्ट्या मागासलेल्या मुस्लिमांना शिक्षण संस्थातील प्रवेशासाठी व शासकीय व निमशासकीय सेवेतील भरतीसाठी ५% आरक्षण विहीत करण्याबाबतचा अध्यादेश दि.०९/०७/२०१४ रोजी प्रख्यापित करण्यात आला होता. तथापि सदर अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर न झाल्यामुळे हा अध्यादेश सद्य:स्थितीत व्यपगत झालेला आहे.
(३) कायदेशीर बाबी विचारात घेऊन योग्य ती निर्णय घेण्यात येईल.

---

**ठाणे येथील मौ.कळवा परिसरातील महसूल विभागाच्या अखत्यारित असलेल्या जमिनीवर ठाणे जिल्हयातील विविध प्रशासकीय प्रकल्प राबविण्याबाबत**

**(४१) ७०७१ (०४-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मौ.कळवा परिसरातील महसूल विभागाच्या अखत्यारित असलेल्या जमिनीवर ठाणे जिल्हयातील विविध प्रशासकीय प्रकल्प राबविण्याचे शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दिनांक ०२ जानेवारी, २०१४ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दिनांक ३० जानेवारी, २०१४ रोजी मा.मुख्यमंत्री सर्व संबधितांसमवेत घेतलेल्या बैठकीमध्ये कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर ठिकाणी प्रशासकीय प्रकल्पाची कामे युध्दपातळीवर पूर्ण करण्याकरिता, सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०७-२०१५) :**(१) मौजे कळवा, ता.जि.ठाणे येथील विविध विभागांना प्रशासकी प्रकल्प राबविण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवरील प्रकल्प मार्गी लावण्यासाठी बैठक आयोजित करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती.

(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विनंतीच्या अनुषंगाने दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन या प्रयोजनासाठी दिलेली जमीन वगळता उर्वरित शासकीय जमिनीवर विभागीय आयुक्त, कोकण यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या मदतीने Central Business District चा बृहत आराखडा तयार करुन घेण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील चालक व वाहक यांचा विमा उतरविण्याचा शासन स्तरावर विचार असल्याबाबत**

**(४२) ७०७८ (०८-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील चालक व वाहक यांचा विमा उतरविण्याचा शासन स्तरावर विचार सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी आतापर्यंत कोणता निर्णय घेतला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अत्यंत प्रतिकुल परिस्थिती नोकरी करणा-या एसटी महामंडळाच्या चालक व वाहकांचा विमा उतरविण्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेण्यासाठी सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक व वाहक यांचा विमा उतरविण्याचे प्रस्तावित नाही. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये सदर बाब विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आरटीओ कार्यालयांतर्गत वाहन चालकांच्या सोयीचे काम करणा-या बेरोजगारांना रोजगार मिळण्याच्या उद्देशाने आरटीओ एजंट अधिकृत करण्याबाबत**

**(४३) ७०८२ (०८-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आरटीओ कार्यालयांतर्गत वाहन चालकांच्या सोयीचे काम करणा-या बेरोजगारांना रोजगार मिळण्याच्या उद्देशाने आरटीओ एजंट अधिकृत करण्याचा शासनस्तरावर विचार सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त राज्यातील बेरोजगार झालेल्या हजारो एजंटांना रोजगार मिळावा याकरिता सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०७-२०१५) :**(१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मासेमारीच्या मोसमात ओएनजीसीद्वारे होणा-या तेल सर्वेक्षणाबाबत**

**(४४) ७०८६ (०८-०३-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, कुलाबा, सातपाटी, पालघर परिसरातील समुद्रामध्ये ओएनजीसीकडून करण्यात येणाऱ्या या सर्वेक्षणामुळे मच्छिमारांचे मोठया प्रमाणात नुकसान होणार असल्याने खोल समुद्रात आंदोलन करण्याचा इशारा मत्स्यव्यवसाय आयुक्त यांची दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी भेट घेऊन मच्छिमार कृती समितीने निवेदनाद्वारे दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास याप्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच परिसरातील गरीब मच्छिमारांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) :**(१) होय.
(२) स्थानिक मच्छिमारांच्या विनंतीनुसार ओएनजीसी व सर्वेक्षण करणा-या प्रतिनिधीसोबत बैठक घेऊन सर्वेक्षण पुढे ढकलण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रादेशिक परिवहन विभागाने गेल्या तीन वर्षापासून आर.सी.बुक देण्याची पध्दत बंद करुन स्मार्ट कार्ड योजना सुरु केल्याबाबत**

**(४५) ७१०४ (०४-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रादेशिक परिवहन विभागाने गेल्या तीन वर्षापासून आर.सी.बुक देण्याची पध्दत बंद करुन स्मार्ट कार्ड योजना सुरु केली असून ज्या कंपनीशी करार झाला तो करार माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास संपुष्टात आल्यामुळे कोल्हापूर जिल्हयात पुन्हा आर.सी.बुक देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्मार्ट कार्ड योजना रद्द केल्यामुळे पुन्हा एजंटगिरी सुरु होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्मार्ट कार्ड योजना पुन्हा सुरु करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
स्मार्ट कार्ड आर.सी.बुक देणाऱ्या सेवापुरवठादाराबरोबरचा करार दि. २७.११.२०१४ रोजी संपुष्टात आला आहे. दि. ०१.१२.२०१४ पासून पुर्वमुद्रीत स्टेशनरीवर छपाई केलेले आर.सी.बुक देण्यात येत आहे.
(२) नाही.

(३) स्मार्ट कार्ड आर.सी. बुक करिता नवीन सेवा पुरवठादाराची खुल्या निविदेआधारे निवड करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

### कोल्हापूर शहरातील छत्रपती शाहू मिलच्या जागेमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याबाबत

**(४६) ७११३ (०६-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील छत्रपती शाहू मिलच्या जागेमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे आंतरराष्ट्रीय भव्य स्मारकाला तत्वत: मान्यता देऊन स्मारक होण्याबाबत सन २०१२ च्या हिवाळी अधिवेशनात तत्कालिन आघाडी सरकारने घोषणा केली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्मारकाकरिता जिल्ह्याचे तत्कालिन पालकमंत्री, दोन मंत्री, सर्व खासदार व आमदार, जिल्हा परिषद सदस्य, जिल्हाधिकारी, महापौर, महापालिका आयुक्त आदींची समिती स्थापन करण्यात आली होती हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त स्थापन केलेल्या समितीने गेल्या दोन वर्षामध्ये एकही बैठक घेतली गेली नाही हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त स्मारक त्वरित होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्रव्यवहार करून विनंती केली होती हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त छत्रपती शाहू स्मारक उभारण्याबाबतचा निर्णय घेण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :**(१) दिनांक १८ डिसेंबर, २०१२ रोजी तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांचा अध्यक्षेतखाली विधानभवन, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जमिनीवर राजर्षी शाहू महाराज यांचे भव्य स्मारक उभारण्यास तत्वत: मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला हे खरे आहे.
(२) प्रस्तुत स्मारक उभारण्याकरिता तत्कालिन पालकमंत्री, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली एक मंत्री, दोन राज्यमंत्री, दोन आमदार, अध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी, कोल्हापूर, महापौर, कोल्हापूर महानगरपालिका, आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका व इतर सदस्य यांची समिती स्थापन करण्यात आली होती.
(३) नाही, सदर समितीच्या दिनांक ७ मे, २०१३, दिनांक १० ऑक्टोबर, २०१३ व दिनांक ७ जानेवारी, २०१४ अशा तीन बैठका झालेल्या आहेत.
(४) होय

(५) व (६) आयुक्त, कोल्हापुर महानगरपालिका यांचेकडून स्मारकाचा प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर प्रस्तावाची सार्वजनिक बांधकाम विभागाकडे छाननी चालू आहे.

---

**कोल्हापूर शहरातील विविध विकासकामांसाठी शासनाने जिल्हास्तर नगरोत्थापन योजनेतून मंजूर केलेल्या निधीबाबत**

**(४७) ७१३२ (०७-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील विविध विकास कामांसाठी शासनाने जिल्हास्तर नगरोत्थापन योजनेतून मंजूर केलेला सुमारे ९ कोटींचा निधी नगरपालिका प्रशासनाने कंत्राटदारांकडून एक टक्का रक्कम मिळावी म्हणून रोखल्याची तक्रार माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील सदरबाजार येथील पोलिस रिक्षा चालकांकडे हप्ता देण्याची मागणी करत असल्याबाबत**

**(४८) ७१३४ (०७-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील सदरबाजार येथील अंजूम पठाण या रिक्षा चालकांकडे पोलिस महिन्याला दोन हजार रुपये हप्ता देण्याची मागणी करत असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास त्या रिक्षा चालकांने आत्महत्येचा प्रयत्न केला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संबंधित पोलिसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

प्रश्नात नमूद रिक्षाचालकाने त्यांच्या ताब्यातील ॲपे रिक्षा क्र.एम.एच.०९-जे-५८४३ मधून अवैध प्रवाशी वाहतुक केलेबाबत मोटरवाहन अधिनियम कलम ६६(१)/१९२ प्रमाणे कारवाई करण्याच्या कारणावरुन त्याने पोलीसावर दबाव आणण्याच्या उद्देशाने आत्महत्येचा बनाव केल्याचे स्पष्ट झाले आहे.

(२) प्रकरणी पोलीस कर्मचारी दोषी नसल्याचे आढळून आल्याने कारवाई करण्यात आलेली नाही.
(३) विलंब झालेला नाही.

---

**उरण (जि.रायगड) तालुक्यातील चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांच्या स्मारकांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(४९) ७१५१ (०७-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील चिरनेर जंगल सत्याग्रहात बलिदान दिलेल्या हुतात्मांच्या मुळगावी असलेल्या स्मारकांची देखभाल व दुरुस्तीसाठी व सातही स्मारकांचे हस्तांतरण करण्यासाठी आणि स्मारकांच्या दुरुस्ती, रंगरंगोटीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने दिड कोटी रुपयांची मागणी गेल्या काही वर्षापासून सातत्याने करुनही याकडे जिल्हाधिकारी यांचेकडून निधी उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून स्मारकांच्या देखभाल व दरुस्तीकरिता निधी उपलब्ध होत नसल्याने स्मारकांची दयनीय अवस्था झालेली आहे हे ही खरे आहे काय,
(३) उपरोक्त स्मारकांच्या देखभाल व दुरुस्तीकरिता शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :**(१), (२) व (३) राज्यातील सर्व हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती व नूतनीकरण करण्यासाठी रु. २५ कोटी इतका अवितरीत नियतव्यय चिन्हांकीत करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडून सदर हुतात्मा स्मारकांच्या दुरुस्तीची अंदाजपत्रके व आराखडे (Plans and estimates) प्राप्त झाल्यावर जिल्हाधिकारी, रायगड यांना निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येरवडयातील मुळा-मुठा नदी काठावरील जागेवर डॉ.सलीम अली पक्षी अभयारण्य करण्याबाबत**

**(५०) ८२४८ (०६-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडयातील मुळा-मुठा नदी काठावर सर्व्हे क्र.१४१ व २३३ वरील तीन हेक्टर जागेवरील डॉ.सलीम अली पक्षी अभयारण्याची वन विभाग व पुणे महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे दुरावस्था झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभयारण्याचे प्रवेशव्दार स्मशानभूमीने व्यापलेले असणे, रस्त्यावर कचरा असणे, पक्षी निरीक्षणासाठीच्या शेडची दुरावस्था होणे, परिसरात राडारोडा, मृत जनावरे टाकणे, बेसुमार वृक्षतोड यामुळे पक्ष्यांचा अधिवास धोक्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०७-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.
येरवडयातील मुळा-मुठा नदी काठावर सर्व्हे क्र. १४१ व २३३ हया ठिकाणी कोणतेही अभयारण्य नाही सदर जागा वन विभागाचे ताब्यात नाही. सदरचे क्षेत्रात पालिकेचे कचरा डेपो व स्मशानभूमी असल्यामुळे सरपणासाठी किरकोळ झाडे व फांद्याची तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि सदर किरकोळ वृक्षतोडीमुळे सदर क्षेत्रास व तेथील पक्षांच्या अधिवासास धोका पोहोचलेला नाही.
(३) व (४) सदरची जमीन वनक्षेत्र नसल्याने विभागास उचित कार्यवाही करणे शक्य झाले नाही. तथापि विभागामार्फत तेथील पक्षांचे अधिवास वाढविणे तथा संरक्षणासाठी एका वनमजूराची नियुक्ती करण्यात आली आहे.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.